## प्रकरण पहिले

# प्रस्तावना

## प्रकरण पहिले

# प्रस्तावना


१.० प्रस्तावना

१.१ महाराष्ट्रातील राजकीय पक्ष पद्धतीचा आढावा

१.२ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

१.३ राष्ट्रवादी काँग्रेसची पक्षाची स्थापना

१.४ राष्ट्रवादी काँग्रेसची पक्षाची विचारसरणी तथा जाहीरनामा

१.५ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची घटना

१.६ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची राजकीय वाटचाल

## १.० प्रस्तावना :-

महाराष्ट्राच्या बदलत्या राजकीय समीकरणांत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या भूमिकेचा अभ्यास करण्यापूर्वी आपणास भारतीय राजकारणाचा आणि राजकीय पक्षांचा थोडक्यात आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते. स्वतंत्र भारताच्या राजकीय इतिहासाकडे दृष्टिक्षेप टाकला असता आपल्याला असे लक्षात येते की, भारतात १९५१-५२ च्या पहिल्या निवडणुका झाल्या तेव्हापासून १९६७ पर्यंत काँग्रेस पक्षाची एकतर्फी सत्ता आपणास केंद्रीय पातळीवर पाहावयास मिळते. १९६७ नंतर आपणास हळूहळू परिस्थिती बदललेली दिसते. दक्षिणेकडील केरळ, आंध प्रदेश, तामिळनाडू इत्यादी राज्यांनी स्वतंत्र प्रादेशिक अस्मितेचे प्रश्न उपस्थित करून प्रादेशिक पक्षांच्या स्थापनेस सुरूवात केली. अर्थात यासाठी केंद्रीय नेतृत्वाकडून त्यांना मिळणारी सापत्न वागणूक हे देखील एक मुख्य कारण होते. हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. उपरोक्त राज्यांनी स्थापन केलेल्या प्रादेशिक पक्षांमध्ये डी.एम.के. (D.M.K.), ए. आय. डी. एम. के. (A.I.D.M.K.), तेलगू देशम पार्टी इत्यादींचा समावेश होतो. महाराष्ट्रसुद्धा यासाठी अपवाद नव्हता तर मराठी अस्मितेच्या व भूमिपुत्रांच्या प्रश्नावरून महाराष्ट्रात बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेची स्थापना केली व पुढे काही दिवसांत शिवसेना हा पक्ष सत्तेपर्यंतदेखील पोहचला.

प्रादेशिक पक्षांची निर्मिती करणारे नेते कोणी वेगळे नसून राष्ट्रीय काँग्रेसमधीलच स्थानिक पातळीवरील असंतुष्ट नेते होते. यांनीच पुढे काँग्रेस पक्षाला स्थानिक स्तरावरून आव्हान देण्यास सुरूवात केली. दरम्यानच्या कालखंडात झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये काँग्रेस पक्षाला भरघोस यश मिळाले आणि देशातील राजकारणाने वेगळेच वळण घेतले. लोकसभेतील मिळालेल्या भरघोस यशाने इंदिरा गांधी यांच्यातील ‘एकाधिकार वृत्ती’ ही अधिकच बळावली. काँग्रेस मधील लोकशाही प्रक्रियेला जवळपास सुरुंगच लावला. परिणाम स्वरूप अनेक राज्यांत केंद्र सरकारविरोधी आंदोलने जोर धरू

लागली व अनेक राज्यांतून इंदिरा गांधी यांना आव्हान देण्यात येऊ लागले. एवढेच नव्हे तर न्यायव्यवस्थेनेदेखील त्यांच्या विरोधात निकाल दिला. इंदिरा गांधींनी मात्र हा निर्णय अमान्य केला. परिणाम स्वरूप जयप्रकाश नारायण यांनी इंदिरा गांधी यांच्या सत्तेला आव्हान दिले. अशा बिकट परिस्थितीत इंदिरा गांधी यांनी २५ जून १९७५ रोजी देशांतर्गत आणीबाणी जाहीर केली आणि लोकशाही व्यवस्थाच एका अर्थाने संपुष्टात आणली. दरम्यान त्यांनी अनेक महत्त्वाच्या नेत्यांना तुरुंगात टाकले. त्यांच्याविरूद्ध जे कोणी बोलले त्यांच्यावर कडक कार्यवाही केली. वर्तमानपत्रांवर निर्बंध लावले तर नव्हे घटनेत सुध्दा हवे तसे बदल करून घ्यावयास त्या डगमगल्या नाहीत. १९७७ मध्ये आणीबाणीचे धोरण मागे घेतल्यानंतर लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा पराभव झाला. निवडणुकीचा निकाल २० मार्च १९७७ लागला. या निवडणुकीत काँग्रेसला फक्त १५३ जागा व जनता पक्षाला २७१ जागा मिळाल्या व श्री. मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखाली जनता पक्षाचे सरकार बनले.

जनता पार्टीचे सरकार फार काळ टिकू शकले नाही. चौधरी चरण सिंग यांनी मोरारजी देसाई याचा पराभव करून प्रधानमंत्री झाल्यानंतर, पार्लमेंट चालू न ठेवता लोकसभेच्या महत्त्व घेतल्या (१९८०). त्यामध्ये इंदिराजींची काँग्रेस आय पुन्हा प्रचंड मताने निवडून आली. दरम्यान १९७८ च्या जानेवारी महिन्यात इंदिरा गांधींनी त्यांना अनुकूल कार्यकर्ते व नेत्यांचा मेळावा घेतला त्यामध्ये त्यांनी 'इंदिरा काँग्रेस' नावाच्या पक्षाची घोषणा केली. मूळ काँग्रेसपासून त्या दूर झाल्या. तेव्हापासून काँग्रेसमधील अंतर्गत वादाला सुरूवात होऊन वैचारिक मतभेद सुरू झाले. तत्पूर्वी आपण भारतातील राजकीय पक्षाची पद्धती कोणत्या स्वरूपाची आहे हे पाहणार आहोत कारण की, भारतात बहुपक्ष पद्धतींचा उदय होऊन आघाडी सरकारचे राजकारण आपणास दिसून येते. त्यामुळे नवनवीन पक्षांची निर्मिती हे तिचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

भारतीय शासन व राजकारण यामध्ये राजकीय पक्षांना विशेष महत्त्व आहे. वास्तविकपणे घटनेमध्ये कोणत्याही राजकीय पक्षांचा उल्लेख नाही, पण राजकीय पक्षांचे अस्तित्व आहे. ते कार्यरत आहेत हे गृहीत धरून राजकीय व्यवस्थेची रचना केलेली आहे. वास्तविकता तर अशी आहे की, आधुनिक राज्य, राष्ट्रात, जेथे लोकशाही कार्यरत आहे तेथे राजकीय पक्ष आहेच. राजकीय पक्षांशिवाय लोकशाही शासन पद्धती कार्यच करू शकत नाही. कारण की, अनेक भाषा, अनेक धर्म, जाती व प्रदेशनिहाय संस्कृती असलेल्या समाजात अनेक गट दिसतात. प्रत्येक गटाचे हितसंबंध वेगवेगळे असतात. या गटांना नेतृत्वाची गरज असते, हे नेतृत्व राजकीय पक्ष पुरवित असतात.

प्रत्येक गटांच्या हितसंबंधाना व्यवस्थितरीत्या मांडण्याचे कार्य राजकीय पक्ष करीत असतात. राजकीय पक्ष विविध गटांच्या हितसंबंधांना एकत्र आणून सर्वसाधारण स्वरूप प्रदान करतात. प्रत्येक गटाचे हितसंबंध वेगवेगळे असतात. पण ते मोठ्या प्रमाणात एक दुसऱ्याला पूरक असतात. असेच गट एका पक्षाच्या झेंड्याखाली नेतृत्वाखाली एकत्र येतात. तसेच काही गटांचे हितसंबंध केवळ वेगळे नसतात, तर परस्परविरोधी असतात. त्यातून वेगवेगळे एक दुसऱ्याला विरोध करणारे राजकीय पक्ष अस्तित्वात येतात. भारत हे एक कल्याणकारी राज्य आहे, या दृष्टिकोनातून भारतातील राजकीय पक्षांच्या अभ्यासाला विशेष महत्त्व आहे.

भारतीय पक्ष पद्धतीत टीकेला वाव आहे. टीकाकारांच्या मते, भारतात अनेक पक्ष पद्धती अस्तित्वात आहे, याची अनुक्रमे राष्ट्रीय, प्रादेशिक, विभागीय इत्यादी प्रकारची रचना आहे. पण याबद्दल लोकांना कोणत्याही पक्षाबद्दल निश्चित भावनिक, मानसिक, वैचारिक बांधीलकी नाही. त्याचा परिणाम भारतात राजकीय वर्तनाच्या बाबतीत कोणतेही नियम निश्चित नाहीत. सतत पक्षांचे विभाजन होत असते. विभाजन निवडणुकीच्या पूर्वी होते. निवडणुकीत एक दुसऱ्याच्या विरोधात प्रचार करतात आणि निवडणुकीनंतर पुन्हा विभाजित पक्ष एकत्रित येतात व सत्ता ग्रहण करतात. म्हणजेच भारतात पक्षांचे विघटन व

युती नेत्यांमुळे होत असते. पक्षातील महत्त्वाचा नेता संपूर्ण पक्ष संघटनेवर आपले वर्चस्व राहील यासाठी सतत प्रयत्नशील असतो.''[१] पण काही कारणांमुळे त्याला हे शक्य नाही झाले, तर तो पक्षातून काही व्यक्तींसह बाहेर पडतो व एका नव्या राजकीय पक्षाची स्थापना करतो.

प्रस्तुत संशोधन विषयात भारतीय स्वातंत्र्यानंतर अनेक दशके सत्तेवर राहिलेला राष्ट्रीय काँग्रेस पक्ष व त्यामधील वैचारिक मतभेदांमुळे विभाजन होऊन अलीकडच्या काळात स्थापन झालेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष महाराष्ट्राच्या बदलत्या राजकीय समीकरणांमधील या पक्षाची भूमिका अभ्यासणे यासाठी संशोधनकर्त्याला वाव आहे. या अनुषंगाने संशोधनकर्त्यांनी या विषयाची निवड केली आहे. प्रत्येक पक्ष स्थापन होण्यापूर्वी त्या पक्षाला इतिहास आणि विचारसरणी असते. त्याशिवाय एखादा पक्ष स्थापन होऊ शकत नाही.

## १.१ महाराष्ट्रातील राजकीय पक्ष पद्धतीचा आढावा :-

प्रातिनिधिक लोकशहीमध्ये राजकीय पक्षांचे महत्त्व अनन्यसाधारण असते. कारण की, कोणत्याही लोकशाही देशांच्या यशस्वितेचे गुढ राजकीय पक्षांच्या एकूणच कार्यपद्धतीवर अवलंबून असते. सत्ता काबीज करून सरकार चालवणारे राजकीय पक्ष आणि त्यांना विरोध करणारे विरोधी पक्ष म्हणून महत्त्वाचे कार्य करणारे राजकीय पक्ष ही आपल्या देशातील एक विचारसरणी आहे. भारतासारख्या मोठ्या लोकशाही असलेल्या देशांमध्ये राजकीय पक्षांना राजकारण करण्यासाठी फार मोठा वाव आहे. म्हणून राजकारणाचा आढावा घेत असताना पक्ष पद्धतीचे विश्लेषण करणे जिकिरीचे झाले आहे. याबद्दल डॉ. लिलॉक यांनी राजकीय पक्षाची व्याख्या करताना म्हटले आहे, ''राजकीय पक्ष म्हणजे राजकीय घटक या दृष्टीने काम करणारा कमी-अधिक प्रमाणात संघटित असलेला नागरिकांचा समूह होय. सामाजिक प्रश्नांबाबत या समूहाचे एकमत असते आणि समान ध्येय पूर्तीसाठी लोकमताची प्राप्ती करून राजकीय सत्तेवर आपली हुकूमत

प्रस्थापित करण्याची त्यांची इच्छा असते.''[२] सांगायचे म्हणजे राजकीय पक्ष अशी संघटना आहे की, जी सत्ताकेंद्री विचाराने समृद्ध असते आणि याच विचार प्रणालीच्या आधारे आपल्या कार्यक्रमाची व्यूहरचना करीत असतात. ''भारताने स्वातंत्र्यानंतर अनेक पक्ष पद्धतीचा स्वीकार करून प्रत्येक राजकीय पक्षंना आप-आपल्या विकासासाठी वाव दिला आहे. अनेक पक्ष पद्धतीच्या संधीचा फायदा घेत भारतात राष्ट्रीय पक्षांचे व प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व दिवसेंदिवस वाढत चालले आहे.

याचबरोबर राज्यातील राजकारणाला वर्तमान काळात महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्राच्या राजकारणाचा अभ्यास करताना महाराष्ट्राच्या राजकीय प्रक्रियेला प्रभावीत करणाऱ्या राजकीय पक्षांचा अभ्यास ओघानेच करावा लागतो. महाराष्ट्रांचा राजकीय इतिहास बघता संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात येण्यापूर्वी पासूनच पक्ष पद्धतीची सुरूवात झाली होती. हिंदू महासभा, राष्ट्रीय महासभा (काँग्रेस), प्रतिसहकार पक्ष, डॉ. आंबेडकरांचा स्वतंत्र मजूर पक्ष व शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन, भारतीय कम्युनिस्ट पक्ष असे विभिन्न पक्ष कार्यरत होते. यानंतर १ मे १९६० रोजी महाराष्ट्राची स्थापना झाल्यानंतर महाराष्ट्रातील राजकीय पक्षांचा दुहेरी अभ्यास करणे भाग आहे. महाराष्ट्रात राजकीय पक्ष व प्रादेशिक पक्षाचे राजकारण गेल्या ५० वर्षांतील विविध परिवर्तन व परिणामांचे गमक राहिले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील राजकीय पक्ष पद्धतीचा आढावा घेणे ही या मागची भूमिका आहे. संसदीय शासन पद्धतीमध्ये राजकीय पक्ष लोकांचे प्रतिनिधित्व संसदेत व राज्य विधिमंडळात करत असतात. महाराष्ट्र राज्याच्या राजकारणातदेखील अनेक राजकीय पक्षांचे अस्तित्व आढळून येते. अखिल भारतीय पातळीवर महाराष्ट्रात उदय पावलेल्या प्रादेशिक पक्षांनी अखिल भारतीय राजकीय पक्षांशी संगनमत करून प्रभावित केलेले राष्ट्रीय राजकारण आपल्याला पाहावयास मिळते. यामुळे महाराष्ट्रातील पक्ष पद्धतीचे स्वरूप पुढीलप्रमाणे अभ्यासता येते.

महाराष्ट्र राज्य निर्मिती पूर्वीपासून महाराष्ट्रात अनेक पक्षांचे अस्तित्व राजकरणात दिसून येते आणि आजही ते अस्तीत्वात आहे. महाराष्ट्राच्या राजकारणावर सातत्याने प्रभाव पाडणारे राजकीय पक्षात राष्ट्रीय काँग्रेस पक्ष, भारतीय जनता पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, शिवसेना, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (विविध गटा-तटांसहित), बहुजन समाज पार्टी, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, जनसुराज्य पक्ष, स्वतंत्र भारत पक्ष अशा विविध पक्षांचा कमी-अधिक प्रमाणात प्रभाव दिसून येतो. ''मराठी अस्मिता, भूमिपुत्रांचा प्रश्न, स्थानिक राजकारणाची गरज व व्यक्ती यातून प्रादेशिक तथा स्थानिक पक्ष निर्माण होण्यास गती मिळाली आहे. अनेक पक्ष पद्धतीची निर्मिती जरी महाराष्ट्रात झाली असली तरी मतदारांचा कौल मात्र विशिष्ट पक्षांनाच असतो.

महाराष्ट्राच्या राजकारणावर काँग्रेस पक्षाचे वर्चस्व आपणास अनेक दशकांपासून पाहावयास मिळते. यशवंतराव चव्हाण यांनी विकसित केलेली काँग्रेस ही आज पृथ्वीराज चव्हाण यांच्या चौकटीत नांदत असलेली दिसते. स्थानिक पातळीपासून काँग्रेसने महाराष्ट्रात पाया भक्कम करून महाराष्ट्राला काँग्रेसचा बालेकिल्ला बनविलेले आहे. १९६० पासून २०१० पर्यंतच्या कालावधीत केवळ १९७८ ते १९८० आणि १९९५ ते १९९९ या कालावधीत काँग्रेस सत्तेपासून दूर राहिली. याशिवाय कधी स्वबळावर तर कधी मित्र पक्षांशी आघाडी करून सत्तेत आपले वर्चस्व कायम ठेवण्यात यश मिळविले आहे.''[३] महाराष्ट्रातील राजकीय पक्ष पद्धती ही विचारसरणी व कार्यक्रम यांच्या आधारावर विकसित झालेली नसून विभूतिपूजा व व्यक्तिवलय या भोवती केंद्रित झालेली दिसते. शिवसेनेचा उदय व विकास आणि विघटन हे बाळासाहेब ठाकरे यांच्या व्यक्तिमत्त्वाचाच आविष्कार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष असला तरी तो शरद पवार यांच्या इच्छाशक्तीवर टिकून आहे. राज ठाकरे यांनी शिवसेनेतून बाहेर पडून आपला करिश्मा दाखवत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची निर्मिती केली. याचबरोबर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियासारख्या पक्षाचे विभिन्न गटांत रूपांतर होण्यासाठी रामदास

आठवले, खोब्रागडे, जोगेंद्र कवाडे, प्रकाश आंबेडकर, गवई यांच्या व्यक्ती वलयाचाच मोठा प्रभाव आपणास जाणवतो.

महाराष्ट्रात शिवसेनेच्या उदयापासूनच प्रादेशिक पक्षांच्या राजकारणाला सुरूवात झाली होती. त्यांना गती प्राप्त झाल्यानंतर १९९० च्या दशकात आणि आज तर महाराष्ट्रात जनसुराज्य पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, शेतकरी कामगार पक्ष, रिपाइ यांसारखे प्रादेशिक पक्ष महाराष्ट्राच्या राजकारणावर भाषा, जात, भूमिपुत्रांचे प्रश्न, प्रादेशिक अस्मिता या विषयांवरून राजकारण करत आहेत. महाराष्ट्रातील पक्ष पद्धतीला विघटनवादाचा रोग जडला आहे. काँग्रेस पक्ष असो की शिवसेना, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया इत्यादी पक्षांचे विघटन झालेले आपणास दिसून येते. याचबरोबर सर्व समावेशकतेचा अभाव हे एक वैशिष्ट्य आपणास महाराष्ट्रातील पक्ष पद्धतीमध्ये पाहावयास मिळते. याशिवाय अपक्षांची वाढती संख्या, संघटनात्मक बांधणीचा अभाव, सत्ताकेंद्री राजकीय पक्ष, पक्षांतर्गत मतभेदही महाराष्ट्रीयन राजकीय पक्ष पद्धतीची वैशिष्ट्ये सांगता येतील.

## १.२ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची स्थापना २८ डिसेंबर १८८५ रोजी झाली. या स्थापनेच्या वेळी बहात्तर प्रतिनिधी हजर होते. सुरुवातीला एक संघटना म्हणून या पक्षाचा सर्वप्रथम उदय झाला. भारतीय राष्ट्रवाद जागृत होण्याची ही एक सुरूवात होती. या पक्षाच्या स्थापनेमध्ये श्री. ए. ओ. ह्यूम या सेवानिवृत्त आय.पी.एस. अधिकारी यांची महत्त्वाची भूमिका आहे.''[४] स्वातंत्र्यपूर्व काळात ही चळवळ होती. स्वातंत्र्यप्राप्ती हा तिचा उद्देश होता. त्याचबरोबर सामान्य भारतीय राजकारणात सामान्य व्यक्तीला सहभागी करणे हा पक्षाचा उद्देश होता. भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये या पक्षाचा मोठा पुढाकार होता. या पक्षाच्या स्थापनेमुळे अनेक तरुण स्वातंत्र्य चळवळीमध्ये ओढले गेले. ''स्वातंत्र्यपूर्व काळात दादाभाई नौरोजी, सुभाषचंद्र बोस, टिळक, गोपाळ कृष्ण गोखले,

रानडे, महात्मा गांधी, यांचे नेतृत्व या पक्षाला लाभले होते. १९४७ पासून ते १९९६ पर्यंत काही वर्षे वगळता हाच पक्ष केंद्रात सत्तेवर राहिलेला आहे.''[५] इंडियन नॅशनल काँग्रेस हा भारतातील सर्वात मोठा, सर्वात यशस्वी, सर्वात टिकाऊ पक्ष म्हणून ओळखला जात होता. १२५ वर्षांची परंपरा या पक्षाला लाभलेला आहे. १८८५ पासून या पक्षात अनेक विभाजन पडूनदेखील आजही भारतीय राजकारणात हा पक्ष कार्यरत आहे.

भारतीय स्वातंत्र्यलढा लढण्याकरिता हा पक्ष १८८५ मध्ये ॲलन ह्यूम यांनी व्योमेशचंद्र बॅनर्जी यांच्या सोबतीने स्थापन केला. ठराविक काळानंतरच्या फुटी, अंतर्गत गटबाजी, संघटनात्मक दुर्बलता, पक्षात व्यक्तिस्तोम, सत्तेचे केंद्रीकरण होऊनही आजही भारतीय राजकारणात तो डावीकडे झुकलेला मध्यममार्गी भूमिका घेणारा पक्ष म्हणून ओळखला जातो. भारतीय राष्ट्रीय चळवळींचा विकास काँग्रेसच्या स्थापनेनंतर सुरू झाला. तेव्हा भारतातील उच्च आर्थिक गट व उच्चशिक्षित वर्गाचे प्रतिनिधित्व करणारा अशी ओळख या पक्षाची होती. तत्कालीन सामाजिक प्रश्नांना या पक्षाच्या व्यासपीठावर स्थान नसल्याने न्यायमूर्ती रानडे यांनी महाराष्ट्रात सामाजिक परिषद सुरू केली. ''शेतकरी व गरिबांचे प्रश्न काँग्रेस पक्ष हाताळत नाही म्हणून महात्मा फुले यांनी टीका केली तर आय.ए.एस.ची परीक्षा भारतात व्हावी म्हणून काँग्रेस पक्ष अधिकृत पक्षाच्या कार्यकारणीतील ठराव करत होते. उच्चभ्रूंचा पक्ष या ओळखीला पहिले आव्हान लोकमान्य टिळक यांनी दिले.''[६] ब्रिटिश सत्तेबद्दलच्या दृष्टिकोनावर गोपाळ कृष्ण गोखले यांचा प्रभाव होता. काँग्रेस पक्षांतर्गत हा गट मवाळ गट म्हणून ओळखला जात असे. १९०७ नंतर ब्रिटिश शासनाला विरोधी घेतलेली भूमिका ही जहाल गट म्हणून ओळखली जाते.

सन १९१७ मधील सत्याग्रह चळवळ चंपारण्य (बिहार) येथे उदयाला आली. याचे नेतृत्व महात्मा गांधीकडे होते. १९२० नंतर महात्मा गांधी काँग्रसचे सर्वोच्च

प्रभावशाली नेते म्हणून ओळखले जाऊ लागले. याच सुमारास भारतात औद्योगिक भांडवलदारांचा वर्ग उदयाला येऊ लागला. काँग्रेस पक्ष, भांडवलदारांचा पक्ष अशी टीका त्यावर होऊ लागली. परंतु महात्मा गांधी यांच्या नेतृत्वामुळे शहरी भागातील कामगार वर्ग व शेतकरी वर्ग या दोघांना एकत्र ठेवण्यात काँग्रेस पक्ष यशस्वी झाला. भारतीय हिंदुत्ववादी विचार प्रभाव व डावे विचार यांवर काँग्रेसला सहज मात करता आली. सत्ता व काँग्रेस पक्ष यांचे समीकरण सन १९३५ च्या निवडणुका पासून जुळले. त्याचेच रूपांतर १९४६ नंतर काँग्रेस व्यवस्थेत झाले.''[७] १९४२ चे चले जाव आंदोलन, सविनय कायदेभंग चळवळ याला प्रचंड प्रतिसाद काँग्रेसला महात्मा गांधी यांच्या नेतृत्वामुळे मिळाला. समाजातील सर्व सामाजिक घटकांत व आर्थिक वर्गांत काँग्रेसला पाठिंबा मिळाला. १८८५ च्या राष्ट्रवादी चळवळीचे रूपांतर काँग्रेस पक्षात झाले.

**काँग्रेस व्यवस्थेचा टप्पा :-**

१९४७ ते १९६७ चा कालखंड हा भारतीय राजकारणात काँग्रेस व्यवस्था या नावाने ओळखला जातो. काही अभ्यासक या काळाचे वर्णन एक पक्ष वर्चस्व पद्धती असे करतात. याच काळात पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाने आपला प्रभाव भारतातील सर्व राज्ये, जिल्हे व खेड्यांपर्यंत पोहोचविला. १९५५ मध्ये काँग्रेसने आर्थिक विकासासाठी समाजवादी प्रारूपांचा स्वीकार करून मिश्र अर्थव्यवस्थेद्वारे खासगी नफ्याला वाव व विकासाची फळे समाजातील खालच्या स्तरापर्यंत पोहचविण्याचे धोरण राबविले. ''१९६७ च्या निवडणुकांमध्ये काँग्रेसला उत्तर भारतातील काही राज्यांत पराभव पत्कारावा लागला, काँग्रेसमध्ये वर्गीय फूट पडू लागली. लोहियावादी बाहेर पडले. बंडखोरांवर नियंत्रण राहिले नाही. काँग्रेस व्यवस्था संपुष्टात आली.''[८] प्रांतिक अभिजनांनी प्रादेशिक पक्ष पर्याय म्हणून स्वीकारला. १९४७ ते १९६७ पर्यंत भारतीय अर्थव्यवस्थेत जे बदल घडले होते त्यातून नवीन वर्गीय रचना तयार होत होती. शहरी

भागात मध्यमवर्ग, ग्रामीण भागात श्रीमंत शेतकरी यांचे हितसंबंध एकत्रित ठेवणे व गरीब वर्गाला न्याय देणे हे प्रश्न काँग्रेससमोर होते.

१९६९ मध्ये सिंडिकेट काँग्रेसच्या आराखड्यानुसार इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या, परंतु काँग्रेस पक्षाचे वैयक्तीकरण झाले. सत्तेचे केंद्र पक्षातून पंतप्रधान कार्यालयाकडे गेले. अंतर्गत आर्थिक प्रश्न, बांग्ला देशाचा प्रश्न यामुळे इंदिरा गांधी यांनी लोकरंजनवादी भूमिकेचा आश्रय घेतला. पक्ष यंत्रणा बाजूला करून थेट लोकांशी संपर्क, या नव्या तंत्रामुळे स्थानिक अभिजन अस्थिर झाले. ''इंदिरा गांधींनी स्थानिक अभिजन जातीचा प्रभाव कमी करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे काँग्रेसचे संघटन दुर्बल झाले. निवडणुकीतील यश पक्षाचे वरिष्ठ नेतृत्व मिळवून देते. या प्रतिमेमुळे पक्षाशी नाळ नसणारे, लोकांच्यात पाठिंबा नसणारे नवे नेतृत्व पक्षात उदयाला आले. उदा. महाराष्ट्रात बॅ. अंतुले, शंकरराच चव्हाण.''[९] पंतप्रधान कार्यालयात नोकरशाहीचे महत्त्व वाढले. पक्षांतर्गत धोरणांवर चर्चा बंद झाल्या. काँग्रेस पक्षातील राज्यातील प्रभावी नेते बाहेर पडले. पक्षात फूट पडली. १९७५ मध्ये जयप्रकाश नारायण यांनी भारतीय समाजातील असंतोष व्यक्त करण्यासाठी जन आंदोलन सुरू केले. पहिल्यांदा स्वातंत्र्यानंतर इंदिरा गांधी सरकारची तुलना ब्रिटिश शासनाबरोबर झाली. 'इंदिरा हटाओ' या आंदोलनात काँग्रेसचा प्रराभव झाला. यामुळे अंतर्गत आर्थिक प्रश्न, आंतरराष्ट्रीय दबाव यामुळे काँग्रेसचा सामाजिक व आर्थिक पाया विस्कळीत झाला.

१९८० मध्ये इंदिरा गांधी सत्तेवर आल्या त्या अधिक आक्रमकपणे 'गरिबी हटाओ' कार्यक्रम राबवू लागल्या. ''भारतीय समाजातील गरीब, मध्यमवर्ग व श्रीमंत वर्ग यांना एकत्रित ठेवण्याची क्षमता गमावून बसल्या. पुन्हा एकदा डावे विचार, जमातवादी विचार यांना पराभूत करण्यासाठी लोक रंजनवादी कार्यक्रमाचा आसरा काँग्रेसने घेतला. काँग्रेस मध्यमवर्गापासून दूर गेला. त्याला आपल्या छत्राखाली घेण्यासाठी हिंदुत्ववादी

पक्षांच्या आंदोलनाला वेग आला. विश्व हिंदू परिषदेचे रामजन्म भूमी आंदोलन व गंगाजल यात्रा हे त्याचेच प्रतीक आहे.''[८]

**काँग्रेसची पडझड :-**

१९८४ मध्ये इंदिरा गांधींच्या हत्येनंतर राजीव गांधी पंतप्रधान झाले. १९५२ पासूनचे सर्वात मोठे यश लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला मिळाले. त्याचबरोबर तत्कालीन भारतातील दहशतवादाचा प्रश्न टोकाला पोहचला होता. मंडल आयोग, खलिस्तान, आसाम येथील प्रश्न सोडविणे हे काँग्रेसपुढे मोठे आव्हान होते. काँग्रेसने उदारीकरणाच्या विचाराला सोबत घेऊन नवीन मध्यमवर्गाचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न केला. वेगवेगळ्या राज्यांतील मध्यम शेतकरी जाती मंडळ मूळ काँग्रेसपासून दूर गेल्या. शेतकरी जातींना काँग्रेस आपला पक्ष वाटत नव्हता. काँग्रेसची प्रतिमा पडून स्थूल झाली. मध्यमवर्गाच्या राजकीय महत्त्वकांक्षा वाढल्या होत्या. त्याला बाजारपेठेचे उदारीकरण हवे होते. परंतु कृषी क्षेत्राला त्याबद्दल शंका होती. या दोन वर्गातील (शहरी विरुद्ध ग्रामीण) संघर्ष काँग्रेसला संपुष्टात आणता आला नाही. ''राजीव गांधी यांच्या हत्येनंतर नरसिंहराव यांनी मनमोहन सिंग यांना अर्थमंत्री करून आर्थिक उदारीकरणाचे धोरण उघडपणे स्वीकारले, परंतु राज्यातील शेतकरी अभिजन यांच्या विरोधामुळे १९९६ पासून काँग्रेसचे राष्ट्रीय पक्ष म्हणून स्थान संपुष्टात आले. भारतातील सर्व सामाजिक घटक व आर्थिक घटक यांना सामावून घेणारा पक्ष १९९८ पर्यंत मोडकळीस आला.''[१०]

१९९१ ते १९९८ पर्यंत काँग्रेसला सामुदायिक नेतृत्व मिळाले नाही. नेहरूप्रणीत काँग्रेस व्यवस्थेकडे जाण्याऐवजी त्यांनी १९६९ चा मार्ग स्वीकारला. 'गांधी घराणे म्हणजे काँग्रेस पक्ष होय.' हा पर्याय त्यांना निवडावा लागला. १९९८ मध्ये सोनिया गांधी काँग्रेस पक्ष अध्यक्षा झाल्यानंतर सोनिया गांधींचे भारतीयत्व व पंतप्रधान पदाच्या वादावरून काँग्रेस पक्षात मतभेद होऊन काँग्रेसमधील वरिष्ठ नेते शरद पवार, तारिक अन्वर, पी.ए. संगमा इत्यादींनी काँग्रेसमधून बाहेर पडून १९९९ मध्ये राष्ट्रवादी

काँग्रेस पक्षाची स्थापना केली. त्याचबरोबर काँग्रेसच्या अंतर्गत गटबाजीमुळे तृणमूल काँग्रेस, तमिळ मनिला काँग्रेस, हिमाचल विकास पक्ष, अरूणाचल काँग्रेस इ. नवीन पक्षांची निर्मिती काँग्रेसमधून फुटून झाली. ''१९९० नंतरचा कालखंड हा भारतातील सर्वात वेगाने अर्थव्यवस्था विकसित झालेला कालखंड आहे. परंतु समाजाची वर्गीय रचना गुंतागुंतीची बनल्याने काँग्रेसला त्यांचा पाठिंबा निश्चित करता येत नाही. प्रादेशिक पक्षांची आघाडी करून सरकार २००४ पासून चालवावे लागत असल्याने समाजातील विभिन्न गटांना एकत्रित ठेवण्याची क्षमता पक्षाकडे नाही. काँग्रेस पक्ष १२५ वर्षे पूर्ण करत असताना मनमोहनसिंग यांच्या रूपाने शहरी व मध्यम वर्गाचा पाठिंबा मिळविणे हाच मार्ग त्यांनी निवडला आहे.''[११] आर्थिक स्तरीकरण वेगाने झाल्याने ग्रामीण भागातील, शहरी भागातील गरिबांना वेगवेगळी अनुदाने देऊन त्यांचा पाठिंबा मिळविणे हा पर्याय ते राबवीत आहेत. शेतकरी अभिजन यांना जागतिक बाजारपेठांच्या स्पर्धेत उभे राहण्याकरिता आघाडी सक्षम बनविण्याचा कार्यक्रम राबवित आहेत. जागतिक महासत्तेचे स्वप्न पूर्ण करण्याकरिता राहूल गांधी हा पर्याय त्यांनी तयार ठेवला आहे. भारतीय समाजातील बदलत्या आर्थिक रचनांना सामावून घेणे, हे काँग्रेसपुढील आव्हान १९६७ नंतर सुरू झाले ते आजही सुरू आहे. त्यातून हा पक्ष पुढील वाटचाल करताना दिसतो. १९९९ मध्ये काँग्रेसमधून फुटून बाहेर निघालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आव्हान त्यांना मोठे आहे. आज महाराष्ट्राच्या सत्तेत व केंद्र सत्तेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशिवाय त्यांना पर्याय उरला नाही.

## १.३ राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना :-

काँग्रेसच्या पक्षाध्यक्षा सोनिया गांधी यांची काँग्रेसमधील एकाधिकारवृत्ती व त्यांच्याभोवती असणारे, ज्यांना जनाधारांचा लवलेशही नाही अशा सल्लागारांमुळे त्यांच्यात चुकीचे निर्णय घेण्याची पद्धत यामुळे जनसमान्यांत जाऊन काम करणाऱ्या अनेक प्रामाणिक कार्यकर्त्यांवर अन्याय होऊ लागला. याचा परिणाम म्हणजे पक्षात

नाराजीची भावना वाढू लागली. सोनिया गांधी यांच्या भूमिकेमुळे शरद पवार यांच्यासारखे नेत्यांना दिवसेंदिवस काम करणे अवघड वाटू लागले. याचा परिणाम म्हणून काँग्रेस पक्षाबद्दल शरद पवार यांचे मतही दिवसेंदिवस प्रतिकूल बनत गेले. त्यांनी सर्वप्रथम कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीजच्या अधिवेशनात भाषण करताना काँग्रेस पक्षासंबंधी त्यांची नाराजीची भावना पहिल्यांदाच व्यक्त केली. त्यावेळी ते बोलताना म्हणाले की, ''काँग्रेस पक्षाच्या स्वातंत्र्यानंतरच्या काळातील पहिली ४५ वर्षे काँग्रेसचा इतिहास देशाच्या इतिहासाशी संलग्न होता. पंडित नेहरू हे उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचे नेते होते. त्यांच्या महानतेत त्यांच्याभोवती असणाऱ्या पश्चिम बंगालचे बिधनचंद्र रॉय, कर्नाटकाचे निजलिंगप्पा, तामिळनाडूचे कामराज नाडर, महाराष्ट्राचे यशवंतराव चव्हाण व बिहारचे लालबहादूर शास्त्री या थोर नेत्यांनी भर घातली होती. जवाहर व त्यांचा संघ या नावाने ते ओळखले जात. पंडित नेहरू आपल्या सहकाऱ्यांना आदराने वागवीत. त्यांना मान देत व त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेत. पक्षाच्या व्यासपीठावर काकासाहेब गाडगीळ, बिजू पटनाईक इत्यादी नेते पंडित नेहरूंवर उघडपणे टीका करत. निर्णय प्रक्रियेच्या या विकेंद्रीकरणामुळे सरकारमध्ये विविध मतांचे प्रतिबिंब पडायचे. मात्र गेल्या काही वर्षांत ही पारदर्शी वृत्ती लोप पावली आहे. सत्ता आणि निर्णय प्रक्रिया यांचे केंद्रीकरण होत आहे. काँग्रेस पक्षातील लोकशाही संपुष्टात आली आहे स्वतंत्रपणे विचार व्यक्त करणाऱ्या नेत्याचे नाव काळ्या यादीत जाते.''[१२]

शरद पवार यांच्या दिल्लीच्या राजकारणाच्या काळात राजीव गांधी, पी.व्ही. नरसिंहराव, सीताराम केसरी व सोनिया गांधी या चौघांनीही शेवटपर्यंत त्यांची उपेक्षाच केली. शेवटपर्यंत पवारांचे पंख छाटण्याचेच काम त्यांनी केले. पक्षहिताच्या भल्यासाठी त्यांनी केलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष केले. काँग्रेसच्या पक्षाध्यक्षा यांचा पवार विरोध सर्वसामान्य होता. म्हणूनच त्यांना शह देण्यासाठी त्या कोणत्याही सभागृहाच्या सदस्य नसताना संसदीय दलाच्या नेत्या झाल्या. पवारांच्या महत्त्वाकांक्षेला त्यांनी कुंपण घातले.

त्या पक्षाध्यक्षा झाल्यापासून त्यांनी बोलावलेल्या बैठकीत कोणीही बोलले नाही. संसदेसमोर येणारी विधेयके, त्याबाबतची पक्षाची भूमिका, डावपेच व धोरणे याबाबत सभागृहात कोणी बोलायचे, वेगवेगळ्या समित्यांवर कोणाला नेमायचे हे निर्णय त्या स्वत:च घेत.

पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील अल्पकालीन सरकार पडल्यानंतर सोनिया गांधी पंतप्रधान होण्यासाठी मोठ्या आत्मविश्वासाने पुढे आल्या. त्यांनी शपथ घेण्याचे नियोजनही केले. त्यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे शरद पवार कमालीचे अस्वस्थ झाले. ''सोनिया गांधी पंतप्रधान झाल्यास पक्षात आपले स्थान दुय्यम दर्जाचे राहीले, अशी त्यांची भावना झाली. तेव्हापासून खऱ्या अर्थाने त्या दोघांमधले अंतर वाढत गेले. भाजपनेही त्यावेळी परकीय पंतप्रधान नको अशी भूमिका घेऊन सोनिया गांधींच्या पंतप्रधान होण्यास तीव्र विरोध केला. यानंतरच्या काळात शरद पवार, पी.ए. संगमा व तारिक अन्वर यांनी या प्रकरणी आक्रमक धोरण स्वीकारले. पंतप्रधानपदाच्या मुद्यांवरून त्यांनी सोनिया गांधी यांच्या नेतृत्वालाच आव्हान दिले. याबाबत त्यांनी एक सविस्तर पत्र काँग्रेस कार्यकारिणीकडे पाठविले व त्या पत्रातील मजकुरावर कार्यकारिणीत खुली चर्चा व्हावी, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. यापत्रामध्ये त्यांनी 'राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि पंतप्रधान या उच्चपदांवर जन्माने भारतीय असलेल्या व्यक्तींनाच स्थान मिळावे म्हणून घटनेत दुरुस्ती करावी आणि काँग्रेसच्या निवडणूक जाहीरनाम्यात तसा प्रस्ताव समाविष्ट करावा. लोकसभा निवडणुकीपूर्वीच याबाबत पक्षाने निर्णय घेणे काँग्रेसच्या हिताचेच आहे. त्यामुळे या प्रश्नाचे भांडवल करणाऱ्या अन्य पक्षाला आवर बसेल.''[१३]

या पत्रातील मजकुरामुळे काँग्रेस पक्षात प्रचंड वादळ निर्माण झाले. सोनिया गांधी यांनी काँग्रेस पक्षाध्यक्षापदाचा राजीनामा कार्यकारिणीकडे पाठविला. त्यामुळे राजकीय चक्रे फिरू लागली. त्यांच्या राजीनाम्याच्या भूमिकेमुळे काँग्रेसमधील नेते अवाक झाले.

कार्यकारिणीने मात्र त्यांचा राजीनामा मंजूर न करता त्यांनाच पदावर राहण्याची विनंती केली. ''काँग्रेस कार्यकारिणीची दिल्ली येथे या संदर्भात निर्णय घेण्यासाठी महत्त्वपूर्ण बैठक झाली. त्यावेळी कार्यकारणीतील बहुतेक सदस्यांनी शरद पवार, पी.ए. संगमा व तारिक अन्वर या तीन ज्येष्ठ नेत्यांची काँग्रेसमधून हकालपट्टी करण्याचा निर्णय घेतला. त्यांना काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वापासून सहा वर्षांसाठी काढून टाकण्यात आले. सीताराम केसरी, राजेश पायलट, जे.बी. पटनाईक या सदस्यांनी मात्र या निर्णयावर आक्षेप घेतला व शेवटपर्यंत आग्रह धरला. मात्र अखेर प्रणव मुखर्जी यांनी हकालपट्टीचा निर्णय जाहीर केला. पक्षातून काढल्यानंतर प्रतिक्रिया देताना पवार म्हणाले, ''माझी गुलामगिरीतून सुटका झाली.''[१४]

पुढे काँग्रेस पक्षातून काढून टाकण्यात आल्यावर शरद पवार, पी.ए. संगमा व तारिक अन्वर या नेत्यांनी आक्रमक राजकीय पाऊल उचलले. शरद पवार यांनी पुढाकार घेऊन त्यांच्या समविचारी नेत्यांनी एक महत्त्वपूर्ण बैठक दिल्लीत दत्ता मोघे यांच्या निवासस्थानी घेतली. तेथे या प्रश्नावर झालेल्या दीर्घ चर्चेनंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष या नवीन राजकीय पक्षाच्या स्थापनेचा निर्णय घेण्यात आला. राष्ट्रीय पातळीवर नवी आघाडी स्थापन करण्याची घोषणा यावेळी शरद पवार यांनी केली. १० जून १९९९ रोजी राष्ट्रवादी काँग्रेसचे पहिले अधिवेशन मुंबईतील षण्मुखानंद सभागृहात झाले. या अधिवेशनाला राज्यातील व राज्याबाहेरील पवार समर्थकांनी प्रचंड गर्दी केली होती. याच सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेस या अखिल भारतीय पक्षाची स्थापना केली गेली व पक्षाच्या अध्यक्षपदी शरद पवार यांची निवड झाली. या अधिवेशनासाठी उत्तर प्रदेश, बिहार, केरळ, आंध्र प्रदेश या राज्यांतील प्रतिनिधीही मोठ्या प्रमाणावर आले होते. अधिवेशनाच्या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेसची मुंबईच्या शिवाजी पार्क मैदानावर जाहीर सभा झाली. त्यासाठी पाच लाख लोक मोठ्या उत्साहाने जमले होते. राष्ट्रवादीच्या पहिल्याच सभेला जमलेल्या विराट जनसमुदायामुळे शरद पवार यांची महाराष्ट्रातील पकड घट्ट

आहे हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. राष्ट्रवादी काँग्रेसला लोकमताचा भक्कम आधार असल्याचा संदेशही सगळीकडे गेला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेनंतर शरद पवार यांनी देशातील व राज्यातील विविध भागांत दौरे करून पक्ष बांधणीच्या कामावर लक्ष केंद्रित केले. राज्यातील अनेक कार्यकर्त्यांच्या व नेत्यांच्या भेटीगाठी घेऊन त्यांना पक्षात सामावून घेतले. त्यामुळे राष्ट्रवादीमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले पक्ष संघटनेत नव चैतन्य आले.

## १.४ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची विचारसरणी तथा जाहीरनामा :-

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात वैचारिकदृष्ट्या साम्यता आढळते. भारतीय वंशाच्या व्यक्तीलाच सर्वोच्च पद मिळाले पाहिजे ही वैचारिक भूमिका त्याला अपवाद आहे. काँग्रेस संस्कृतीत तयार झालेल्या नेत्यांची आणि कार्यकर्त्यांची वर्णी मोठ्या प्रमाणात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पाहावयास मिळते. पक्षाने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यातून आपली विचारसरणी व धोरण पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहे.

१) भारतात जन्मलेली व्यक्तीच सर्वोच्च पदावर विराजमान होऊ शकेल. या तत्त्वाला धरून नागरिकत्वाच्या कायद्यात दुरूस्ती करणे.

२) उत्पादकता वाढवून रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देणे, तसेच असंघटित कामगारांना संरक्षण देण्यास प्राधान्य देणे.

३) हरित क्रांतीच्या दृष्टीने धोरण तयार करणे आणि राष्ट्रीय पातळीवर कृषी विकास घडवून आणणे

४) अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी स्वतंत्र खाते निर्मिती आणि त्या संदर्भानेच स्वतंत्र आयोगाची स्थापना करून त्याला संवैधानिक दर्जा बहाल करण्याचे पक्षाचे धोरण आहे.

५) सार्वत्रिक आरोग्यविषयक धोरणांचा आराखडा तयार करणे आणि त्यात महिलांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष पुरविणे.

६) महिलांची सर्वांगीण प्रगती घडवून आणण्यासाठी विशेष धोरण तयार करून त्याची अंमलबजावणी करणे.

७) रेल्वे सुरक्षा आयोगाची स्थापना करून वाढल्या रेल्वे अपघातांवर अंकुश ठेवण्यासाठी प्रयत्न करणे.

८) समाजातील उपेक्षित घटकांना राजकीय सत्तेत विशेष सहभाग देणे.

९) बौद्धिक संपदा आणि जैविक तंत्रज्ञानाच्या सुरक्षिततेसंदर्भात आवश्यक त्या कायद्यांची निर्मिती करणे.

१०) शासकीय खात्याच्या कामकाजात संस्थांचे सहकार्य घेणे व त्यांच्या सहभागासाठी प्रयत्न करणे.

११) गतीने वाढणाऱ्या कॉर्पोरेट जगताचा विचार करून पक्षाने कॉर्पोरेट कंपन्यांसाठी आचारसंहिता निर्माण करण्याचा विचार जाहीरनाम्यात मांडला आहे. तसेच या आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी एका स्वतंत्र आयोगाची स्थापना करून त्या आयोगाच्या नियंत्रणाखाली कंपन्यांचा कारभार चालविण्यासाठी पक्ष प्रयत्न करील.

१२) राष्ट्रवादी काँग्रेसने मुक्त अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला असला तरी सार्वजनिक क्षेत्रांची निर्मिती व त्याला चालना देण्यासाठी पक्ष कटिबद्ध राहू इच्छितो.

१३) देशांच्या संरक्षणाच्या दृष्टीने आवश्यक असणारी माहिती मिळविण्यासाठी स्वतंत्र उपग्रहीय यंत्रणा उभारणे.

१४) भारतीय बाजारपेठेला परदेशी माल आणि कालबाह्य तंत्रज्ञानाच्या प्रभावापासून मुक्त ठेवणे. त्या अनुषंगाने स्वतंत्र प्राधिकरणाची स्थापना करणे.

१५) देशाच्या संरक्षणासाठी प्रसंगी जिवाची बाजी लावणाऱ्या लष्करी अधिकारी व जवान यांच्यासाठी कायमस्वरूपी स्वतंत्र वेतन आयोग नेमणे.''[१५]

राष्ट्रवादी काँग्रेसने आपल्या जाहिरनाम्यामध्ये सर्वांगीण विकासाचा आराखडा तयार करून यामध्ये उपाययोजनेचा अंगीकार केला आहे. परंतु ज्या कारणासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचा जन्म झाला तो मुद्दाच आज संपुष्टात आला आहे. तसेच आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा काँग्रेस पक्षाशी सलगी करत असल्यामुळे तो काँग्रेसमध्ये सामील होणार का? यासंबंधी चर्चा सदैवच होत असते. पुढे भविष्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे धोरण काय असेल यावरच पक्षाच्या राजकारणाची दिशा निश्चित होऊ शकेल व यातून एक नवीन संदेश मिळेल.

## १.५ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची घटना :-

प्रत्येक राजकीय पक्षाची स्वत:ची एक राज्य घटना किंवा घटना असते. त्याप्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेसची स्वत:ची राज्यघटना खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| कलम १ | : | पक्षाचे नाव राष्ट्रवादी काँग्रेस असेल तिचे मुख्य कार्यालय नवी दिल्ली येथे असेल. |
| कलम २ | : | राष्ट्रवादी पक्षाच्या उद्दिष्टांचा समावेश केला जो की राज्य घटनेच्या आदर्शावर ठरविली आहे. |
| कलम ३ | : | या कलमांमध्ये राष्ट्रवादी पक्षाच्या ध्वजाची रचना केली आहे की, ज्यामध्ये तिरंगी रंगाचा समावेश आहे. एकदम वर भगवा, मध्यभागी पांढरा आणि खाली हिरवा रंग दाखविला आहे. |
| कलम ४ | : | निवडणूक चिन्ह यामध्ये घड्याळ दर्शविले आहे. |
| कलम ५ | : | पक्षीय समित्यांचे विवेचन केले आहे. |
| कलम ६ | : | यामध्ये सदस्यत्वाचे स्पष्टीकरण दिले आहे. |
| कलम ७ | : | पक्षातील समित्यांचा कार्यकाळ |

कलम ८ : महिला, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्ग व अल्पसंख्याकांसाठी आरक्षणाची तरतूद केली आहे.

कलम ९ : पक्षीय कायद्यानुसार उपसमित्यांचे न्यायक्षेत्र व घटनात्मक क्षेत्रांचे स्पष्टीकरण दिले आहे.

कलम १० : जिल्हा समिती

कलम ११ : विभागीय समित्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या

कलम १२ : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राज्य समितीचे स्पष्टीकरण

कलम १३ : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील राज्य सदस्य समितीचे प्रतिनिधित्व

कलम १४ : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील राष्ट्रीय समितीचे विवेचन केले आहे.

कलम १५ : पक्षातील सहकारी सदस्यांचे विवेचन

कलम १६ : पक्षातील पदसिद्ध सदस्यांचे स्पष्टीकरण

कलम १७ : पक्षातील विषय समित्यांचे विवेचन

कलम १८ : राष्ट्रीय सभांचे स्पष्टीकरण

कलम १९ : यामध्ये विशेष राष्ट्रीय सभेचे स्पष्टीकरण

कलम २० : पक्षाध्यक्षांच्या निवडणुकीसंबंधी विवेचन

कलम २१ : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील स्थायी समितीचे विवेचन

कलम २२ : खजिन्याबद्दल विवेचन

कलम २३ : राष्ट्रीय सरचिटणीसाबद्दल विवेचन

कलम २४ : पक्षातील सदस्यांच्या पडताळणीबद्दल स्पष्टीकरण

कलम २५ : पक्षीय निवडणुकीतील वाद याबद्दलचे स्पष्टीकरण

| | | |
|---|---|---|
| कलम २६ | : | पक्षीय निवडणूक तंत्राबद्दलचे स्पष्टीकरण |
| कलम २७ | : | पक्षीय सांसदीय मंडळाचे विवेचन |
| कलम २८ | : | पक्षीय निवडणूक समित्यांचे विवेचन |
| कलम २९ | : | पक्षीय जागांचे स्पष्टीकरण |
| कलम ३० | : | पक्षीय विभाग व लघु विभागाचे विवेचन |
| कलम ३१ | : | यामध्ये पक्षातील विशेषकृत समित्या पक्षाच्या अधीन असेल याचे विवेचन |
| कलम ३२ | : | पक्ष शिस्तीचे स्पष्टीकरण |
| कलम ३३ | : | यामध्ये पक्षीय धोरण संशोधन परिषदेचे विवेचन केले आहे. |
| कलम ३४ | : | पक्षातील समित्यांचे नीतिमूल्यांचे विवेचन |
| कलम ३५ | : | पक्षीय नियतकालिकाचे विवेचन |
| कलम ३६ | : | पक्षीय वित्तीय हिशोब तपासणीसंबंधी स्पष्टीकरण |
| कलम ३७ | : | यामध्ये पक्षीय संकीर्ण कार्याचे विवेचन |
| कलम ३८ | : | पक्षीय घटनेमध्ये बदल करण्यासंबंधी सूचनांचे स्पष्टीकरण''[१६] |

राष्ट्रवादी काँग्रेसची पक्षीय घटना ही ३८ कलमांवर आधारित आहे. यामध्ये प्रत्येक कलमाचे एक वैशिष्ट्ये व स्पष्टीकरण यामध्ये दिलेले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची घटना ही पूर्णपणे भारतीय राज्यघटनेच्या ध्येय धोरणांवर आधारित आहे. तसेच पक्षातील प्रत्येक सदस्याचे कार्य पक्षीय योगदान याबद्दल स्पष्टीकरण दिले आहे.

## १.६ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची राजकीय वाटचाल :-

भारतात १९५६ ते १९७७ पर्यंत काँग्रेस वर्चस्वाचे राजकारण राहिलेले आहे. ''प्रा. रजनी कोठारी यांनी या काळातील भारतीय राजकीय व्यवस्थेचे वर्णन 'काँग्रेस व्यवस्था' असे केले आहे आणि ते महाराष्ट्रातीलदेखील लागू होते. सत्तेत केंद्रस्थानी

मुख्य प्रवाही पक्ष आणि मध्यममार्गी विचारसरणी ही काँग्रेस व्यवस्थेची प्रमुख लक्षणे सांगता येतील. केंद्राप्रमाणे महाराष्ट्रातदेखील काँग्रेसबद्दल हेच लक्षण नव्वदच्या दशकापर्यंत लागू होते.''[१७] महाराष्ट्राच्या स्थापनेपासून ते १९९५ पर्यंत काँग्रेस पक्ष सतत सत्तेवर राहिला आहे. फक्त १९७८ ते १९८० या कालखंडाचा अपवाद वगळता ग्रामीण आणि नागरी या स्तरापासून ते राज्य स्तरापर्यंत काँग्रेसचे वर्चस्व होते.

१९९४ नंतर महाराष्ट्रातील राजकारणात काँग्रेस व्यवस्थेची पडझड आणि हिंदुत्ववादी शक्तींचा उदय झाला. महाराष्ट्रातील काँग्रेस वर्चस्वाला १९७७ मध्ये प्रथम मोठा धक्का बसला होता. १९७७ मध्ये झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला. महाराष्ट्रात प्रथमच काँग्रेसविरोधी आघाडीच्या राजकारणास मोठे यश मिळाले होते. ''विरोधकांच्या ऐक्यातून काँग्रेसला पर्याय निर्माण झाला होता. शिवाय काँग्रेसच्या पतनाची प्रक्रिया महाराष्ट्रात सुरू झाली होती. जी देशभरात १९६७ नंतरच सुरू झाली होती. आणीबाणीनंतर १९७७ मध्ये केंद्रात जनता पक्षाचे सरकार आले आणि महाराष्ट्रात १९७८ मध्ये विधानसभेच्या निवडणुका झाल्या दरम्यान, १९७७ च्या पराभवानंतर काँग्रेस पक्षात मोठी फूट पडून इंदिरा निष्ठांची काँग्रेस (इं.) व इंदिरा विरोधकांची काँग्रेस (रेड्डी) असे दोन काँग्रेस पक्ष स्थापन झाले. जानेवारी १९७८ मध्ये त्याचे पडसाद महाराष्ट्रातही उमटले आणि राज्यातही काँग्रेसचे दोन काँग्रेस पक्ष उदयास आले. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील व शरद पवार रेड्डी गटाबरोबर गेले. १९७८ ची निवडणूक दोन्ही पक्षांनी स्वतंत्रपणे लढविली. काँग्रेस पक्षाच्या वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील पहिले संयुक्त सरकार स्थापन केले होते. महाराष्ट्राच्या इतिहासात प्रथमच काँग्रेस पक्षास स्पष्ट बहुमत मिळाले नव्हते. दरम्यान वसंतदादा व तिरपुडे यांचे संयुक्त सरकार १८ जुलै १९७८ रोजी पडले आणि जनता व मित्र पक्षांच्या सहकार्याने शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील पहिले गैर-काँग्रेस सरकार स्थापन झाले. शरद पवारांना १७७ आमदारांचा पाठिंबा होता (जनता व

मित्रपक्षाचे १३३, काँग्रेसचे ३८ व काँग्रेस (इं) ६) या आघाडीला पुरोगामी लोकशाही दल (पुलोद) असे नाव देण्यात आले.''[१८]

१९८६ मध्ये शरद पवारांची समाजवादी काँग्रेस इंदिरा काँग्रेसमध्ये विलीन झाल्याने काँग्रेसची पडझड काही थांबली नाही. उलट समाजवादी काँग्रेसच्या विलिनीकरणानंतर पुलोद आघाडी विस्कळीत झाली आणि त्यामुळे निर्माण झालेली विरोधी पक्षाची पोकळी शिवसेनेने भाजपाशी युती करून भरून काढली. काँग्रेसअंतर्गत संघर्ष, मराठा नेतृत्वातील फाटाफूट, बहुजन समाजास बरोबर घेऊन राज्य करण्याच्या कलेचा ऱ्हास, केंद्रीय नेत्यांचा वाढता हस्तक्षेप आणि बहुमत असूनही अस्थिरता अशी काँग्रेसची अवस्था झाली. १९९५ मध्ये विधानसभा निवडणूक महाराष्ट्रातील राजकीय प्रक्रियेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरली. या निवडणुकांत काँग्रेसचा पराभव झाला. १९७७ ते १९९५ पर्यंतच्या काँग्रेस अंतर्गत पेच प्रसंगांची परिणती १९९५ च्या निकालात घडून आली. शिवसेना-भाजप युतीने १३८ जागा आणि २९ टक्के मत मिळवून अपक्ष आणि काँग्रेस बंडखोरांच्या पाठींब्याने सरकार स्थापन केले. महाराष्ट्रातील हे पहिले पूर्णपणे बिगर काँग्रेस सरकार होते.

१९९९ च्या जून महिन्यात उदयास आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसने कमी काळामध्ये राष्ट्रीय पक्ष म्हणून आपली ओळख निर्माण केली. ''सुरुवातीला १९९९ च्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत पक्षाचे ८ उमेदवार निवडून आले. तर महाराष्ट्रातील १९९९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये ५८ उमेदवार निवडून आले. यानंतर पुन्हा २००४ च्या लोकसभा निवडणुकीत पक्षाने ९ जागा मिळविल्या तर २००८ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत पक्षाने ७१ जागा पटकावल्या. २००९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला ६२ जागेवर धन्यता मानावी लागली. १९९९ पासून आजपर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने केंद्रात व महाराष्ट्रात भारतीय काँग्रेसच्या नेतृत्वाखाली आघाडीत मित्रपक्ष म्हणून काम करत आहे. थोडक्यात सांगायचे

तर ''तुझे माझे जमेना आणि तुझ्यावाचून करमेना'' अशी अवस्था राष्ट्रवादी काँग्रेसची झाली आहे.''[१९]

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने स्थानिक स्वराज्य संस्था, सहकार क्षेत्र आणि महाराष्ट्राच्या संपूर्ण राजकीय कारकीर्दीवर आपली पकड प्रस्थापित व मजबूत केली आहे. सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वर्चस्व आहे. या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार असून महाराष्ट्रातील अध्यक्ष मधुकर पिचड हे आहेत. महाराष्ट्रातील मंत्री मंडळातील वाटा मुख्यमंत्रिपद सोडले तर बरोबरीचा आहे. उपमुख्यमंत्रिपद राष्ट्रवादी काँग्रेसकडे आहे. पक्षाचे चिन्ह घड्याळ आहे. पक्षाच्या निर्मितीपासून आजपर्यंत हा पक्ष केंद्र व राज्यात सत्तेतच राहिला आहे. पण महाराष्ट्राव्यतिरिक्त या पक्षाचा दुसरा कोणत्याही राज्यात म्हणावा तितका प्रभाव दिसून येत नाही हे आपणास स्पष्टपणे दिसून येते.

**समस्या सूत्रण :-**

१० जून १९९९ ला 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्षा'ची स्थापना झाल्यापासून १९९९ साली देशात लोकसभा व महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका झाल्या. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली या निवडणुका स्वतंत्रपण लढविल्या. परंतु या अल्पकाळात अस्तित्वात आलेल्या या पक्षाला अपेक्षित यश मिळाले नाही. लोकसभेमध्ये सहा व विधानसभेमध्ये ५८ जागांवर या पक्षाला समाधान मानावे लागलं. परंतु निडणूकीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस व इंदिरा काँग्रेस यांनी एकत्र येण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे काँग्रेसचे विलासराव देशमुख मुख्यमंत्री, तर राष्ट्रवादीचे छगन भुजबळ हे उपमुख्यमंत्री झाले व आघाडी सरकार महाराष्ट्रात सत्तेवर आले.

यानंतर मात्र शरद पवार यांच्या प्रकृतीने त्यांना तितकीशी साथ दिली नाही. पुढे लोकसभेत व विधानसभेच्या निवडणुका तोंडावर येऊन पोहचल्या. या काळात पवारांनी प्रकृतीची तमा न बाळगता प्रचाराचा झंजावात सुरू केला व २००४ च्या लोकसभेची

त्यांची सदस्य संख्या ही सहावरून आठवर गेली. एवढेच नव्हे तर विधानसभेमध्ये या पक्षाने १२२ जागा लढवून ७१ जागा जिंकल्या व राज्यातील सर्वात मोठा पक्ष म्हणून स्थान मिळविले. पश्चिम महाराष्ट्रातल्या काही जिल्ह्यांतला पक्ष अस म्हणणाऱ्यांना या निकालाने चांगली चपराक बसली.

'राष्ट्रवादी काँग्रेस' पक्षाने उत्तर महाराष्ट्रात २० पैकी १०, विदर्भात २१ पैकी १०, मराठवाड्यात १८ पैकी १०, पश्चिम महाराष्ट्रात ४२ पैकी २२, तर मुंबईत ६ पैकी ४ जागी यश मिळविले. निवडणुकीद्वारे पवारांनी राष्ट्रवादी हा राज्यव्यापी पक्ष आहे हे सिद्ध केले. १९९९ मध्ये राष्ट्रवादी हा महाराष्ट्रात तिसऱ्या क्रमांकाचा पक्ष होता. या निवडणुकीद्वारे मात्र तो पहिल्या क्रमांकावर आला.

विलासराव देशमुख हे मुख्यमंत्री झाले व पुन्हा ज्येष्ठतेच्या आधारावर उपमुख्यमंत्री पदासाठी रस्सीखेच झाली त्यावर निर्णय घेताना यासाठी त्यांनी निवडणुकीचा आधार घेतला व आर. आर. पाटील हे तरुण तडफदार नेतृत्व पक्षाला व राज्याला उपमुख्यमंत्री म्हणून लाभले. यामुळे पक्षामध्ये ज्येष्ठतेच्या आधारावर अरेरावी करणाऱ्या नेतृत्वाला खीळ तर बसलीच शिवाय पक्षातील शिस्तही कायम राहिली.

आजही राष्ट्रवादीचा व पर्यायाने शरद पवारांचा संघर्ष अनेक पातळ्यांवर चालूच आहे. एकाच वेळी त्यांचा अनेकांशी लढा चालू आहे. एका बाजूला ते काँग्रेसच्या नेतृत्वाशी लढतात. तर दुसऱ्या बाजूला भाजपा-शिवसेना या जातीयवादी पक्षांशी राजकीय स्पर्धा चालूच आहे. काँग्रेस पक्षाशी युती करून आपले वेगळे अस्तित्व ठेवून आज ते काँग्रेसबरोबर सत्तेत समानतेच्या तत्त्वावर सहभागी आहेत.

आज शरद पवार यांना पंतप्रधानपदाचे प्रबळ दावेदार मानण्यात येते. कारण त्यांना अवगत असलेले राजकीय डावपेच व त्यांचा मुत्सद्दीपणा हा सर्वांना परिचित आहे. परंतु हे येणारा काळ ठरवील. राज्यशास्त्राच्या अभ्यासक या नात्याने या पक्षाचे यश व

वाटचालीची अन्वयार्थक मांडणी करण्यासाठी प्रस्तुत अभ्यास विषयाची निवड करण्यात आलेली आहे.

राष्ट्रवादीचे नेतृत्व हे कोणत्या घटकांमुळे पुढे आले व शरद पवार यांनी आपले नेतृत्व अबाधित राखण्यात मिळविलेले यश हे नेतृत्वाचा अभ्यास करणाऱ्यांना न सुटलेला प्रश्न आहे. त्याचे रहस्य हे शरद पवारांनी एक नेता म्हणून अवलंबविलेल्या तीन तत्त्वामध्ये दडलेले आहे.

१) वर्तमान ज्वलंत प्रश्नांच्या संदर्भात आपल्या पक्षाची भूमिका जनसामान्यांच्या बोलीभाषेतून मांडण्याची त्यांची खास शैली.

२) महाराष्ट्रातील मतदारसंघात पवारांची ज्वलंत आणि भावनात्मक भाषणे महत्त्वाचे आकर्षण राहिलेली आहेत.

३) त्यांची मतदारांना व्यक्तिगत व भावनात्मक दृष्टिकोनातून आव्हानं करण्याची शैली.

याबरोबरच त्यांचा राज्य विधिमंडळातील महत्वपूर्ण योगदान व केंद्रीय विधिमंडळातील कणखर भूमिकेमुळे त्यांचे निर्विवाद नेतृत्व पुढे येण्यास भक्कम पाया तयार झाला.

**गृहीतके :-**

१) महाराष्ट्राला समृद्ध अशी राजकीय परंपरा असली तरी राष्ट्रवादींची स्थापना अलीकडील काळातील आहे.

२) राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने महाराष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक सुधारणांसाठी केलेले कार्य भाजपा-सेना व इतर पक्षांच्या तुलनेत अधिक आहे.

३) महाराष्ट्राची सत्ता हस्तगत करण्यासाठी राजकीय नेतृत्वाने जातीचे व भावनिक व तर्कशुद्ध राजकारणाचा उपयोग केलेला आहे.

४) विशेषतः शरद पवार यांच्या अष्टपैलू नेतृत्वामुळे लहान शेतकरी, भूमिहीन जनता, दलित आणि स्त्रिया यांच्यामध्ये शोषणाविरुद्ध जाणीव, जागृती व परिवर्तन घडवून आणले आहे.

५) शरद पवार यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतांना घेतलेले निर्णय व सध्या केंद्रीय पातळीवरून कृषिमंत्री म्हणून पार पाडत असलेल्या भूमिकेने महाराष्ट्रातील समाजाच्या समस्यांकडे लक्ष वेधले आहे.

**उद्दिष्टे :-**

प्रस्तुत शोध प्रबंधासाठी काही उद्दिष्ट्ये निश्चित केलेली आहेत ती पुढीलप्रमाणे-

१) राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेपूर्वी राष्ट्रवादीच्या नेतृत्वाचा अभ्यास करणे व महाराष्ट्रातील विविध राजकीय पक्षांचे बलाबल स्पष्ट करणे.

२) महाराष्ट्रातील विविध समस्यांचा आढावा घेऊन त्यांचा विविध राजकीय पक्षांकडून राजकीय उद्दिष्टप्राप्तीसाठी कसा उपयोग केला जातो याचा अभ्यास करणे.

३) शरद पवार यांच्या नेतृत्वाचे विश्लेषण आणि अभ्यास करणे.

४) भावनिक व तर्कशुद्ध मुद्यांना राजकीय स्वरूप देण्यामागील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे स्वरूप देण्यामागील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या भूमिकेचे विश्लेषण व अभ्यास करणे.

५) राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने युतीच्या राजकारणातून साध्य केलेल्या उद्दिष्टांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :-**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा विकास व नेतृत्व या संदर्भातील राजकीय कार्य समजून घेण्यासाठी संख्यात्मक व गुणात्मक व ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. अनुभवाधिष्ठित साधने व तंत्रे यांचादेखील वापर करण्यात आला आहे. शासकीय

प्रकाशने महाराष्ट्र विधिमंडळातील वाद-विवाद, रा. काँ. पक्षाची प्रकाशने वापर प्राथमिक स्त्रोत म्हणून करण्यात आला. संदर्भ, नियतकालिके, वर्तमानपत्रांतील अग्रलेख यांचा वापर द्वितीय साधने म्हणून केला गेला आहे.

**प्रकरणनिहाय सारांश :-**

**प्रकरण १ ले - प्रस्तावना :-**

प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्रातील राजकीय पक्ष पद्धतीचा आढावा, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना, राष्ट्रवादी काँग्रेसची विचारसरणी तथा जाहीरनामा, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची घटना तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची राजकीय वाटचाल इत्यादींचे सखोल विश्लेषण करण्यात आले आहे.

**प्रकरण २ रे - राजकीय पक्षपद्धती उगम व विकास :-**

प्रस्तावना, व्याख्या, राजकीय पक्षाचे महत्त्व, राजकीय पक्षाचा उगम, राजकीय पक्षाचा विकास, भारतीय पक्षपद्धती उगम व विकास, राजकीय पक्ष पद्धतीचे प्रकार इत्यादी बाबींचे विश्लेषणात्मक विवेचन करण्यात आले आहे.

**प्रकरण ३ रे - महाराष्ट्राच्या भौगोलिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय विश्वाचा अभ्यास :-**

प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्रातील भौगोलिक पार्श्वभूमी, महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक विश्वाचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे.

**प्रकरण ४ थे - महाराष्ट्रातील प्रमुख राष्ट्रीय प्रादेशिक पक्ष :-**

प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्रातील राष्ट्रीय पक्ष, राष्ट्रीय काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा सखोल आढावा घेऊन महाराष्ट्रातील प्रादेशिक पक्ष म्हणजेच शिवसेना, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, रिपब्लिकन पक्ष, शेतकरी कामगार पक्ष इ. पक्षांचा सखोल आढावा घेऊन विवेचन करण्यात आले आहे.

**प्रकरण ५ वे - निष्कर्ष व शिफारशी :-**

प्रस्तुत वरील चारही प्रकरणातील संशोधनाचे अध्ययन करून त्याविषयी निष्कर्ष काढून त्याबद्दल काही शिफारशी मांडण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्राच्या राजकारणाचा अभ्यास करताना महाराष्ट्राच्या राजकीय प्रक्रियेला अनेक पक्ष प्रभावित करीत असताना दिसतात. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर राजकीय पक्षाचे प्राबल्य दिसून येते. आजपर्यंत महाराष्ट्रातील राजकीय पक्षाचा इतिहास पाहिला तर काँग्रेस पक्षाचे वर्चस्व दिसून येते. महाराष्ट्रातील किंबहुना देशातील राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष मुख्य प्रवाहात उभा असताना आपणास दिसतो. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापनेपूर्वी शरद पवार हे काँग्रेस पक्षातील एक वरिष्ठ प्रभावी नेतृत्व म्हणून ओळखले जात होते. नंतरच्या काळात काँग्रेस पक्षातील सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाच्या व स्वदेशीच्या मुद्दयावरून शरद पवार यांना झालेल्या विरोध हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या निर्मितीला पोषक ठरला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने देशातील केंद्रिय पातळीवरील राजकारणाला सुद्धा प्रभावीत करून केंद्राच्या सत्तेत सहभागी होऊन आपले कार्य करत आहे. राजकीय पक्ष हा कोणत्या देशातील राजकीय व्यवस्थेमध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडत असतो. त्या अनुषंगाने महाराष्ट्राच्या बदलत्या राजकीय समीकरणातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची भूमिका हा विषय संशोधन कार्यासाठी निवडण्यात आला आहे.

**संदर्भ :-**


१) प्रा. बी. वाय. कुलकर्णी (१९९७) : भारतीय शासन आणि राजकारण, प्रकाशन के.एस. अतकरे, कैलास पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद, पृ. १८१.

२) डॉ. विठ्ठल मोरे, प्रा. राजशेखर सोलापुरे, डॉ. कुसुम पवार, प्रा. डॉ. संग्राम मोरे (२०१०): अरुणा प्रकाशन, औसा रोड, लातूर, पृ. २१८.

३) कित्ता, पृ. २२१.

४) Bipin Chandra (1998) : India's Struggle For Independence, Penguin Books, P. 61.

५) प्रा. बी. वाय. कुलकर्णी (१९९७) : भारतीय शासन आणि राजकारण, प्रकाशन के.एस. अतकरे, कैलास पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद, पृ. १८४.

६) तुकाराम जाधव (२०११) : महाराष्ट्र वार्षिकी २०११, प्रकाशक द युनिक ॲकॅडमी, शिरोळे रस्ता, पुणे, पृ. ६२.

७) कित्ता, पृ. ६३.

८) कित्ता, पृ. ६३.

९) कित्ता, पृ. ६४.

१०) कित्ता, पृ. ६५.

११) कित्ता, पृ. ६८.

१२) सोपान गाडे (डिसें. २००७) : साहेब, आविष्कार प्रकाशन, पुणे, पृ. १०६.

१३) कित्ता, पृ. १०८.

१४) कित्ता, पृ. १०९.

१५) विठ्ठल मोरे, राजशेखर सोलापुरे, कुसुम पवार, संग्राम मोरे (ऑक्टो. २०१०): अरुणा प्रकाशन, औसा रोड, लातूर, पृ. २१८.

१६) www.ncpco.in, Nationalist Congress Party Constitution.

१७) तुकाराम जाधव (२०११) : महाराष्ट्र वार्षिकी २०११, प्रकाशक द युनिक ॲकॅडमी, शिरोळे रस्ता, पुणे, पृ. ६१५.

१८) विठ्ठल मोरे, राजशेखर सोलापुरे, कुसुम पवार, संग्राम मोरे (ऑक्टो. २०१०): अरूणा प्रकाशन, औसा रोड, लातूर, पृ. २२३.

१९) कित्ता, पृ. २२४.